Download Our Apps

१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

लोक LIVE
तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

जळगाव, रविवार, दि.२ नोव्हेंबर २०२५ | RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024–26 | • अंक – ९८ • पाने ६ • किंमत ३ रु.




# आषाढी कार्तिकी साधूजन येती भक्तीजन येती..!

आज कार्तिकी एकादशी म्हणजे या महिन्याची पहिली भागवत एकादशी आणि चतुर्मास समाप्ती अशी अनेक बिरूदे या एकादशीला लावलेले आहेत. पंढरपूरला कार्तिकी एकादशीनिमित्त फार मोठी यात्रा भरते. लाखो वारकरी यात्रेत आपल्या लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी येतात. आणि भक्तीचा हा आनंद सोहळा साक्षात पाहता यावा. श्री विठ्ठल व रुक्मिणीमातेच्या पदस्पर्श दर्शनाने अवघे जीवन पावन व्हावे.. अशी अनुभूती या दर्शनी समाधानातून होत असते. कार्तिकी एकादशी पासून संपूर्ण महाराष्ट्रात यात्रा जत्रा सुरू होतात. गेली २८ युगांपासून कर्कटावर ठेवून पंढरीचा पांडुरंग २४ तास भक्तांना दर्शन देत असतो. १८ पगड जाती धर्माच्या लोकांना आणि साधुसंतांना आपल्या मायेच्या पंखाखाली घेऊन पंढरीचा हा पांडुरंग या कलियुगात देवांचा देव म्हणून पंढरीत उभा आहे. वामांगी रुक्माई आहे. बाजूला सत्यभामा कालिंदी मित्र विंदा, या भगवंताच्या पट्ट राण्या देखील पाठीमागे उभ्या आहेत. पंढरीचा पांडुरंग हा ''सुंदर ते ध्यान उभे विटेवरी कर कटेवरी ठेवूनिया''या न्यायाने पुंडलिकाच्या भेटीसाठी विटेवर उभा आहे. भक्तराज पुंडलिक, देवांना साक्षात जेऊघालणारे नामदेवराव महाराज, भंडारा डोंगरावर सदैव चिंतन करणारे,





संत तुकाराम महाराज, आणि भागवत धर्माची पताका फडकावीत आळंदी ते पंढरपूर पायी वारी करणारे संत ज्ञानेश्वर माऊली, संत चोखामेळा, गोरोबा कुंभार, संत जनाबाई, संत कान्होपात्रा या सर्व संत मांदियाळीला भूलो की च्या वैकुंठात वाळवंटी कीर्तनात भक्तां सवे नाचताना देहभान विसरून हा परमात्मा भक्तांच्या भक्तीला भुलत असे.. पंढरीचा पांडुरंग हा असा एकमेव देव आहे, ज्याचे नित्य दर्शन पदस्पर्शाने होते. श्री विठ्ठलाला व रुक्मिणी मातेची मनोभावे दर्शन घेताना पायाला हात लावून मूर्तीला स्पर्श करून धन्यता मिळत असते. हा देव सर्वसामान्यांचा देव आहे. वारकऱ्याच्या हृदय बंदी खाण्यात म्हणून तर जनाबाईने याला बंदी करून घेतले होते. धरीला पंढरीचा चोर, गळा बांधुनिया दोर''त्याला चोर म्हणून हिणवणाऱ्या संत जनाबाईला हाच पांडुरंग परमात्मा दळण दळू लागायचा, जनाबाईची वेणी फनी करताना, अनेक कामे करताना सदैव भक्तांसाठी धावून येणारा पांडुरंग आज पंढरी नगरीत लाखो वारकऱ्यांच्या सुखरूप येण्याची वाट पाहत आहे. दिंडी रवण, पांडुरंग पुर, पंढरी, पंढरपूर अशी कितीतरी नावे या पंढरपूरला तर आहेतच परंतु वैकुंठ नगरी हे नाव संतांनी देखील याला ठेवून सार्थ केले आहे . रुक्मिणीचा वल्लभ, अनंत कोटी ब्रम्हांडनायक, महाराजाधिराज योगिराज परब्रह्म अशा या पांडुरंगाला आवडते ती भक्ती म्हणजे घरातल्या आई-वडिलांची सेवा चाकरी. आज सांप्रत काळात हेच दृश्य दुर्मिळ होत चालले आहे. आणि हे समजून घेण्यासाठी प्रत्येक मानवाने गुरु केला पाहिजे, त्याशिवाय ज्ञान प्राप्त होणार नाही. आणि या ज्ञानाच्या आधारावरच यशस्वी जीवनाची वाटचाल करता येईल.

**रमेश जे .पाटील**
**आडगाव तालुका चोपडा.**
**९८५०९८६१००**

पान १ वरून

## तर त्यांना..

घ्यायचा नाही. ॲनाकोंडा बसला आहे. मी मागेही आवाहन केल होतं. निवडणूक जशी जवळ येईल तसतशी यांची दडपशाही सुरू होईल. आम्ही कायदेशीर मार्ग अवलंबत आहोत. येत्या काही दिवसात आपण न्यायालयात जाणार आहोत. न्यायालयाकडून न्याय मिळतो की नाही पाहू. आम्हाला आता न्याय पाहिजे. सर्व पुरावे दिल्यानंतर. त्या न्यायालयात न्याय मिळेल याची खात्री आहे. नाही तर जनतेचं न्यायालय निर्णय घ्यायला तयार आहे, असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

## आंध्र प्रदेशातील वेंकटेश्वर...

होती. यावेळी रेलिंग कोसळल्याने एकच गोंधळ उडाला. यामुळे चेंगराचेंगरी झाली. बचावकार्य सुरू असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती प्रशासनाने व्यक्त केली आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिस पथके आणि आपत्कालीन कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. घटनेनंतर लगेचच राज्याचे कृषी मंत्री के. अचन्नायडू मंदिरात पोहोचले आणि परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मंदिर अधिकाऱ्यांची भेट घेतली. गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि मदत कार्यात मदत करण्यासाठी अतिरिक्त पोलिस दल तैनात करण्यात आले आहे.

## पाचोऱ्यात शेतकऱ्यांचे...

शेतकरी भारतीयच आहेत (चीन, पाकिस्तानी नाहीत) हे सदैव लक्षात ठेवून वेळीच नैसर्गिक तत्वावर न्यायनिवाडा करावा; यापुढे वेळकाढूपणा मुळीच करु नये.

आजच्या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य क्रुषी उत्पादक संघटनेचे पदाधिकारी व पाचोरा तालुक्यातील खालील शेतकरी बांधव उपस्थित होते. निळकंठ प्रल्हाद पाटील, आकाश चित्ते, किरण पाटील, ईश्वर पाटील, रविंद्र भावसार, नाना हिरे, जनक पाटील, समाधान पाटील,अमोल पांढरे, अनिल पाटील, जितेंद्र पाटील, गिरीष पाटील,गणेश पाटील, भागवत पाटील, बन्सीलाल पाटील, कृष्णा वानखेडे, नाना पाटील, मनोज भगवान पाटील, रोहिदास पाटील, राजेंद्र फकिरा पाटील, मांगिलाल पाटील, काशिनाथ पाटील, विठ्ठल गुंजाळ, किशोर गरुड यांचेसह शेतकरी बांधव हजर होते.

## निवडणूक आयोगाचे भागीदार...

नाही. आम्ही मोर्चात सहभागी झालो आहोत. मी विधानसभेतील पक्षनेता म्हणून मोर्चात चाललो आहे, असे स्पष्ट केले. बाळासाहेब थोरात, वर्षा गायकवाड आणि महाराष्ट्रातील अनेक नेतेही या मोर्चात सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. मतचोरी झाली आहे आणि मतचोरी करून सत्ता मिळवली गेलीय, हे आता समोर आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. आज राज ठाकरेपासून ते राहुल गांधीपर्यंत सर्वांना हा मुद्दा पटला आहे. अजित पवारांविषयी बोलताना शेतकरी संकटात असताना खरेतर संवेदनशील भाषण करायला हवे; पण अजित पवारांनी 'निवडणुका जिंकण्यासाठी कर्जमाफी केली' असे वक्तव्य केले आहे. ही शेतकऱ्यांशी बेईमानी आहे. याचा बदला निवडणुकीत दिला जाईल. लोक या धोरणाची दखल घेवून योग्य निर्णय करतील.दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिवंगत पंतप्रधान नेहरूंवर केलेल्या टीकेबाबत छेडले असता अब हाथ में कुछ नहीं तो नेहरू दिखते हैं; जब कुछ खुद से करना नहीं आता तो नेहरू ही दिखते हैं, असा टोला वडेट्टीवार यांनी लगावला.

पंतप्रधान काय करत आहेत? शेजारील देशांशी चांगले संबंध प्रस्थापित केले नाहीत. चीनसोबत मैत्रीचा दावा करुन त्यांनी सैन्यबळ उभे केल्याचा आरोपही केला जातो. स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळात १३ वर्षे तुरुंगात गेलेल्यावर टीका करण्याचा अधिकार पंतप्रधानांकडे आहे का?, हे बघून नंतर बोलावं,असेही ते म्हणाले. हे सारे निवडणुकीत लोकांना मूर्ख बनवण्याचे धंदे आहेत. जनता अशा धंद्यात फसणार नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल बोलताना हे खरं आहे की काही संघटना नोंदणीकृत नाहीत. नोंदणी नसलेली संघटना पैसे कशी वापरते, कुठे ठेवते हे स्पष्ट नाही. ज्यांची नोंदणी नाही, त्या संघटनांद्वारे समाजावर व धर्मावर परिणाम होण्याची शक्यता आहे, हा गंभीर प्रश्न आहे, असा आरोप त्यांनी केला.

## सारखं फुकटात कसं...

महिन्यात ही समिती आपला अहवाल सादर करेल. त्यानंतर तीन महिन्यांत म्हणजेच ३० जून २०२६ पूर्वी कर्जमाफीचा निर्णय करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केली आहे. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या या विधानामुळे नवा वाद होण्याची शक्यता आहे.

## पणन महासंघाला..

सभेत यंदाच्या आर्थिक वर्षातील महासंघाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. विशेष म्हणजे, ६० वर्षांच्या इतिहासात प्रथमच पणन महासंघाला तब्बल १०० कोटी रुपयांचा विक्रमी नफा झाला आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल उपाध्यक्ष रोहित निकम यांनी सर्व संचालक मंडळ, सभासद, कर्मचारी आणि केंद्र शासनाचे आभार मानत पुढील वाटचाली संदर्भात मार्गदर्शन केले.

सभेच्या शेवटी आगामी वर्षासाठी कामकाजाचे नियोजन, शेतकऱ्यांच्या हितासाठी नव्या उपक्रमांची आखणी आणि सहकार क्षेत्रातील विविध सुधारणा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# सत्यम नगरात चोरट्यांचा धुमाकूळ

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगावे** प्रतिनिधी

शहराच्या कानळदा रोडवरील भाग्यश्री पेट्रोल पंपाच्या बाजूला असलेल्या सत्या नगरात अज्ञात चोरट्यांनी बंद घर फोडून चोरी करण्याचा प्रयत्न केल्याची घटना शुक्रवार ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता उघडकीस आली आहे. घरात कोणतेही मौल्यवान दागिने किंवा रोकड नसल्यामुळे चोरट्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले असले तरी, त्यांनी सामानाचे मोठे नुकसान केले आहे.

शाहू नगर येथील रहिवासी तुषार प्रकाश पिसाळ यांचे सत्या नगरात नवीन घर आहे. दिवाळीनिमित्त त्यांची पत्नी माहेरी गेल्यामुळे तुषार पिसाळ हे आपल्या मूळ घरी शाहू नगरात राहत होते. यामुळे सत्या नगरातील घर बंद होते. बंद घर हेरून अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास घराचे मुख्य दरवाजाचे कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. घरात प्रवेश केल्यानंतर चोरट्यांनी लोखंडी कपाटाचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. तसेच कपाटातील सर्व सामान अस्ताव्यस्त फेकून दिले. मात्र, घरात मौल्यवान दागिने किंवा रोख रक्कम नसल्याने चोरट्यांचा चोरी करण्याचा प्रयत्न निष्फळ ठरला. तुषार पिसाळ हे आज, शुक्रवार ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता आपल्या नवीन घराच्या झाडांना पाणी टाकण्यासाठी सत्या नगरातील घरी आले. घरात प्रवेश करताच दरवाजाचा कडी-कोयंडा तुटलेला आणि आतील सामानाची नासधूस झालेली पाहून त्यांना चोरीचा प्रकार उघडकीस आला.

## निधन वार्ता

### बिसमिल्ला शेख

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**रावेर** प्रतिनिधी



निंभोरा बु:तालुका येथील बिसमिल्ला अकबर शेख वय (८५) यांचे ०१ रोजी शनिवारी वृद्धापकाळाने निधन झाले, त्यांच्या पश्चात, पत्नी चार मुले, चार मुली, जावई,नातवंड असा परिवार आहे. ते सादिक शेख यांचे वडील व माजी ग्रामपंचायत सदस्य मुजाहिद शेख यांचे मोठे वडील होते.

### भगीरथ बाविस्कर

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमळनेर** प्रतिनिधी



येथील ढेकू रोड परिसरातील रहिवासी भगीरथ बाविस्कर यांचे दि २८ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा,मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### मांगो पाटील

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमळनेर** प्रतिनिधी



तालुक्यातील मारवड येथील रहिवासी मांगो पितांबर पाटील यांचे दि १ रोजी सकाळी १०:२० वा. वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. ते प्रभारी गटशिक्षणाधिकारी,अमळनेर रावसाहेब मांगो पाटील यांचे वडील असून त्यांची अंत्ययात्रा आज दि २ रोजी सकाळी १०.३० मारवड येथून निघेल.

### शकुंतलाबाई न्याती

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

गणेश कॉलनीतील रहिवासी श्रीमती शकुंतलाबाई रामकिसन न्याती, (वय ८७ वर्ष) यांचे शनिवार, दि.१ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२.२५ वाजता दुःखद निधन झाले. अंत्ययात्रा रविवार, दि. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता निघेल. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार असून ते शारदा क्लासेसचे संचालक कैलास न्याती, शाम न्याती आणि सौ. शोभा तोतला यांच्या आई होत.

# रोहित आर्यचा अंत्यसंस्कार पुण्याच्या स्मशानभूमीत

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पुणे** प्रतिनिधी



मुंबईतील पवई येथे १७ मुलांना ओलीस ठेवून झालेल्या धक्कादायक घटनेनंतर पोलिसांच्या चकमकीत ठार झालेल्या रोहित आर्यचा अंत्यसंस्कार गुरुवारी पहाटे पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत करण्यात आला. या घटनेने राज्यभरात खळबळ उडाली होती. पोलिसांनी रोहितचा मृतदेह शवविच्छेदनानंतर त्याच्या कुटुंबीयांकडे सुपूर्द केला. त्यानंतर पत्नी आणि कुटुंबीयांनी अत्यंत गुप्ततेत अंत्यसंस्काराची तयारी केली.

रोहित आर्यचा मृतदेह गुरुवारी मध्यरात्रीनंतर पुण्याला आणण्यात आला. अंत्यसंस्काराची तयारी रात्रीच सुरू करण्यात आली होती. पहाटे दोन वाजून तीस मिनिटांनी अंत्यसंस्कार पार पडले. त्याच्या पत्नी, मुलगा आणि काही नातेवाईकांनी चेहऱ्यावर स्कार्फ बांधून उपस्थिती दर्शवली. उपस्थितांमध्ये सुमारे १२ नातेवाईक होते. संपूर्ण विधी अत्यंत शांततेत आणि मर्यादित उपस्थितीत पार पडला.

पोलिसांच्या माहितीनुसार, मुंबईतील पवई येथील आरए स्टुडिओमध्ये रोहित आर्यने १७ मुलांना ओलीस ठेवले होते. मुलांना वेब सिरीजमध्ये काम देण्याचे आमिष दाखवून ऑडिशनच्या नावाखाली त्यांना स्टुडिओमध्ये बोलावण्यात आले होते. मात्र, या घटनेनंतर पोलिसांनी विशेष मोहीम राबवून मुलांची सुटका केली. मोहिमेदरम्यान स्टुडिओच्या बाथरूमच्या खिडकीची काच फोडून पोलिसांनी आत प्रवेश केला आणि रोहितकडे शस्त्र दिसल्याने त्यांनी गोळीबार केला. या चकमकीत रोहित ठार झाला, तर १७ मुलांसह २० जणांचे जीव वाचले.

नंतर तपासात समोर आले की, रोहितकडे असलेली बंदूक बनावट होती आणि ती एअर गन असल्याचे निष्पन्न झाले. या घटनेने चित्रपटसृष्टी आणि जनमानसात मोठी चर्चा निर्माण केली आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास पुढे सुरू ठेवला असून, त्यामागील हेतू आणि पार्श्वभूमीचा शोध घेतला जात आहे.

या घटनेने मुंबईसह संपूर्ण राज्याला हादरवले असून, मनोरंजन क्षेत्रातील सुरक्षिततेबाबत नव्याने प्रश्न निर्माण केले आहेत. पोलिसांनी अशा प्रकारच्या घटनांवर लक्ष ठेवण्यासाठी अतिरिक्त पावले उचलण्याची तयारी दर्शवली आहे.

**Change In name**

I Prafull Prakash Koli Declaer My Old Name Is Prafulla Prakash Koli Have Permanentaly Change Prafull Prakash Koli Please Note It

Prafull Prakash Koli
At Post Jalgaon. Dist Jalgaon

# भरदिवसा गोळ्या झाडून गणेश काळेची निर्घृण हत्या!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पुणे** प्रतिनिधी



भरदिवसाच्या उजेडात पुण्यात पुन्हा एकदा गुन्हेगारी टोळ्यांचा रुद्रावतार पाहायला मिळाला. कोंढव्यात आज झालेल्या गँगवॉरमध्ये गणेश काळे या तरुणाची गोळ्या झाडून आणि कोयत्याने वार करून हत्या करण्यात आली. या घटनेने पुणे शहर हादरले असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

कोंढवा परिसरातील मुख्य रस्त्यालगत गणेश काळे याच्यावर आंदेकर टोळीतील चार जणांनी गोळीबार केला. मिळालेल्या माहितीनुसार सहा ते सात गोळ्या झाडल्यानंतर त्याच्यावर कोयत्यानेही हल्ला करण्यात आला. गंभीर जखमी झालेल्या गणेश काळेचा घटनास्थळीच मृत्यू झाला. गणेश काळे हा गायकवाड टोळीतील समीर काळे याचा सख्खा भाऊ असल्याचे समोर आले आहे. समीर काळे हा सध्या वनराज आंदेकर खून प्रकरणात तुरुंगात असून, त्याच्यावर या हत्येत वापरलेल्या शस्त्रांचा पुरवठा केल्याचा आरोप आहे.

या घटनेनंतर पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. संपूर्ण परिसर बंद करून फॉरेन्सिक टीमला पाचारण करण्यात आले आहे. टीमने घटनास्थळावरून पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली असून, आसपासच्या नागरिकांच्या हालचालींवर तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे. घटनास्थळावर लोकांच्या गर्दीमुळे परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अतिरिक्त पोलीस दलाची मदत घेण्यात आली.

प्राथमिक तपासानुसार, ही हत्या वनराज आंदेकर खून प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आंदेकर टोळीने आपल्या साथीदाराच्या हत्येचा बदला घेण्यासाठीच गणेश काळे याची हत्या केल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. या घटनेनंतर गायकवाड आणि आंदेकर टोळ्यांमधील संघर्ष पुन्हा एकदा उफाळण्याची भीती व्यक्त होत आहे.

दरम्यान, गणेश काळे याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून, हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी पुणे पोलिसांनी विशेष पथक तयार केले आहे. सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत आहे. शहरातील गुन्हेगारी टोळ्या आणि त्यांचे आर्थिक व राजकीय संबंध पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. पोलिसांच्या पुढील तपासातून या घटनेमागील खरा सूत्रधार कोण, हे स्पष्ट होणार आहे. या घटनेने पुणेकरांमध्ये दहशत पसरली असून, शहरातील कायदा-सुव्यवस्था व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासनाने गुन्हेगारी टोळ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# 'त्या' चालकाविरोधात गुन्हा दाखल

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगावे** प्रतिनिधी

तालुक्यातील बिलखेडा गावाजवळील स्वप्निल हॉटेल जवळ भरधाव वेगाने येणाऱ्या कारने जोरदार धडक दिल्याने रामदेववाडी येथील मुकेश आबेसिंग राठोड (वय २९) या तरूणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना २९ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजता घडली होती. याबाबत गुरूवारी ३० ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १ वाजता एमआयडीसी पोलीस ठाण्यात कारचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेली माहिती अशी की, जळगाव तालुक्यातील रामदेव वाडी गावात मुकेश राठोड हा आपल्या आईवडीलांसह वास्तव्याला होता. मजूरीचे काम करून तो उदरनिर्वाह करत होते. दरम्यान बुधवारी २९ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजता मुकेश हा बिलखेडा गावाजवळील स्वप्निल हॉटेल समोरून पायी जात असतांना त्याला भरधाव वेगाने येणाऱ्या कार क्रमांक (एमएच १९ बीपी ०१०१) ने जोरदार धडक दिली.

# लासूरनजीक चार जणांकडून १४ किलोपेक्षा अधिक गांजा जप्त

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चोपडा** प्रतिनिधी



चोपडा ग्रामीण पोलिसांनी मध्यप्रदेशातून आणल्या जाणाऱ्या अवैध गांजाच्या वाहतुकीवर मोठा धडक दिला आहे. एका गुप्त माहितीद्वारे पोलिसांनी केलेल्या या कारवाईत चार जण ज्यात एक पुरुष व तीन महिला यांच्या ताब्यातून तब्बल १४ किलो ५१८ ग्रॅम वजनाचा, ३ लाख १९ हजार ३९६ रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक महेश टाक हे करीत आहेत.

अंमली पदार्थांच्या वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अपर पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, पोलीस उपअधीक्षक कविता नेरकर आणि वरिष्ठ अधिकारी आण्णासाहेब घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली चोपडा ग्रामीण पोलीस सतत पेट्रोलिंग करत असतात. या मोहिमेदरम्यान मध्यप्रदेशातून अवैध गांजा, गावठी कट्टे, गुटखा यासारख्या मानवी आरोग्यास हानिकारक पदार्थांची खरेदी-विक्री व वाहतूक करणाऱ्या संशयितांविषयी माहिती मिळविण्यासाठी पोलिसांनी विशेष नेटवर्क तयार केले होते.

३० ऑक्टोबर २०२५ रोजी पोलीस निरीक्षक महेश टाक यांना मिळालेल्या गुप्त बातमीवरून सत्रासेन ते लासूर या मार्गावर नाकाबंदी करण्यात आली. पोलीस पथकात पोहवा शशिकांत पारधी, रत्नमाला शिरसाठ, चेतन महाजन यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. सायंकाळी सुमारे ५.२५ वाजता संशयित चार जणांना नाटेश्वर मंदिराजवळ थांबविण्यात आले. त्यांच्याकडे असलेल्या पिशव्यांची तपासणी केल्यावर मोठ्या प्रमाणावर गांजा आढळून आला. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अशी आहेत जतिन बबन जावळे (२२, कांदिवली, मुंबई), संताबाई मनोहर गवारे (७०), शांताबाई पंडरी सुमरपल्ली (७२) आणि राधाबाई लक्ष्मणराव सोनवणे (७८, सर्व रा. भिमनगर, परभणी). या चौघांकडून मिळून १४ किलो ५१८ ग्रॅम वजनाचा गांजा, एकूण किंमत ३ लाख १९ हजार ३९६ रुपये, तसेच तीन मोबाईल फोन आणि रोख रक्कम १०२० रुपये असा एकूण ३ लाख ३६ हजार ४१६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अंमली पदार्थांची वाहतूक करणाऱ्या संशयितांविरुद्ध चोपडा ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलिसांच्या दक्षतेचे व संघटित गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याच्या त्यांच्या कटिबद्धतेचे उदाहरण ठरली आहे.

हे पत्र लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड मालकीचे त्यांच्या वतीने मुद्रक, प्रकाशक, संपादिका शांता कमलाकर वाणी यांनी लोकशाही इनोवेशन्स प्राइवेट लिमिटेड एम-१८१, एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून २२०, बळीराम पेठ, जळगाव जिल्हा जळगाव ४२५००१ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले.
This LOKSHAHI newspaper is owned by Lokshahi Innovations Private Limited and printed on its behalf by Shanta Kamalakar Wani, Printer, Publisher, Editor at Lokshahi Innovations Private Limited M-181, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra). Published at 220, Baliram Peth, Jalgaon District Jalgaon 425001 Maharashtra.आर.एन.आय.नं MAHMAR/२००९/३३०२८ पोस्टल रजी. नंबर - No.JAL/16/2024-26 EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष १६ वे. जळगाव फोन नं. ०२५७-२२३७४९१,२२४१४९१,२९७०३६८.
संपर्क कार्यालय: मुंबई- १०, शंकेश्वर सोसायटी, मानपाडा रोड, नवजीवन हॉस्पीटल समोर, डोंबीवली पूर्व जि. ठाणे, मो. नं. ९४२२२८४५११. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे.

दैनिक लोकशाही
जळगाव next
६
जळगाव, रविवार दि.२ नोव्हेंबर २०२५
epaper.lokshahilive.com

# सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**वरणगाव** प्रतिनिधी

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची १८५ वी जयंती परिसरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करून मोठया उत्साहात साजरी करीत भव्य मिरवणूक काढण्यात आली.

स्वतंत्र्य भारताचे पहिले गृहमंत्री व राष्ट्रीय एकत्माचे जनक लोहपुरुष दिवगंत सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त शहरातील जावळे वाडा परिसरातील सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याला विविध राजकिय पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तर सकाळच्या सुमारास पोलीस प्रशासनाचा वतीने युनिटी ऑफ रन चे आयोजन करण्यात आले होते तर सायकाळच्या सुमारास सरदार पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून शहरात भव्य मिरवणुक कढण्यात आली होती त्यात मोठ्या संख्येने तरुणाईने सहभाग नोंदविला होता तसेच पिंपळगाव ।। खु ।। येथे मान्यवरांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले तर तळवेल येथे सरदार पटेल यांच्या प्रतिमेचे दुधाभीषेक करून माजी मंत्री एकनाथ खडसे व चंद्रकांत बढे यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवांदन करण्यात येऊन मिरवणुक काढण्यात आली होती

## महत्वाचे

### चौघांनी केली तरूणाला जबर मारहाण

**अमळनेर –** जुन्या वादातून एका तरूणाला शिवीगाळ करत लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करून गंभीर दुखापत केल्याची घटना अमळनेर तालुक्यातील मांडळ गावात रविवारी २६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता समोर आली आहे. याप्रकरणी गुरूवारी ३० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता मारवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आला. याबाबत अधिक माहिती अशी की, अमळनेर तालुक्यातील मांडळ गावात सोनू संजय कोळी वय २५ हा तरूण आपल्याक कुटुंबियांसह वास्तव्याला आहे. रविवारी २६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता सोनू कोळी हा गावातील महादेव मंदीराजवळ फोनवर बोलत असतांना जुन्या वादातून गावात राहणारे योगेश हिलाल कोळी, सुरज राजेंद्र कोळी, समाधान भास्कर पाटील आणि अक्षय राजेंद्र कोळी सर्व राहणार मांडळ ता. अमळनेर यांनी शिवीगाळ करत लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करून गंभीर दुखापत केली. जखमी अवस्थेत पडलेल्या भावाला पाहून त्यांचा भाऊ किरण संजय कोळी याने सोनूला अमळनेर ग्रामीण रूग्णालयात दाखल केले. उपचार घेतल्यानंतर सोनू याने दिलेल्या फिर्यादीवरून मारहाण करणारे योगेश हिलाल कोळी, सुरज राजेंद्र कोळी, समाधान भास्कर पाटील आणि अक्षय राजेंद्र कोळी सर्व राहणार मांडळ ता. अमळनेर यांच्या विरोधात मारवड पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ दिनेश पाटील हे करीत आहे.

### दोन दुचाकींची समोरासमोर धडक

**जळगाव –** कृषी उत्पन्न बाजार समिती जवळ झालेल्या आपघातात दुचाकीस्वार व्यापारी हे गंभीर जखमी झाल्याची घटना मंगळवारी २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० वाजता घडली होती. याप्रकरणी बुधवारी २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात दुचाकीस्वारा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# प्रगतीशील महाराष्ट्र २०२५ या तीन दिवशीय प्रदर्शनाचे आयोजन

## खा. स्मिताताई वाघ यांचा पुढाकारः दिल्लीच्या फ्रेंड्ज एक्झीबिशन अँड प्रमोशनच्यावतीने आयोजन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी




भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र विकासाचे शिखर गाठतो आहे. भारतीयांच्या जीवनात प्रगतीचे नवे दार उघडावे यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांच्या वतीने चालविणाऱ्या योजना व उपक्रमांची जळगाव जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना माहिती व्हावी यासाठी खास प्रगतीशिल महाराष्ट्र २०२५ या भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि. ३ ते बुधवार दि. ५ नोव्हेंबर दरम्यान जळगावच्या शिवतीर्थ –जीएस ग्राऊंडवर रंगणाऱ्या या आगळ्यावेगळ्या प्रदर्शनाला जळगावकरांनी भेट द्यावी, असे आवाहन लोकप्रिय खासदार स्मिताताई वाघ व आमदार राजूमामा भोळे व दिल्लीतील फ्रेंड्ज एक्झिबिशनच्या अखिला श्रीनिवासन यांनी केले आहे. शनिवार दि. १ नोव्हेंबर रोजी येथील हॉटेल सिल्व्हर पॅलेस येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत हे मान्यवर बोलत होते.

दिल्ली येथील फ्रेंड्ज एक्झीबिशन अँड प्रमोशन या संस्थेंने केंद्र सरकारची जनजागरण मोहीम राबविताना या प्रदर्शनाला मूर्त रूप दिले आहे. 'एक उन्नत राष्ट्र की और..' असे घोषवाक्य घेऊन भरविण्यात आलेले हे प्रदर्शन तीनही दिवस सकाळी साडेदहा ते सायंकाळी पाच या कालावधीत सर्व नागरिकांसाठी पाहायला खुले असणार आहे. या प्रदर्शनाचे दि. ३ नोव्हेंबर रोजी अकरा वाजता जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री मा. गिरीशभाऊ महाजन साहेब यांच्या हस्ते व जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्राचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबरावजी पाटील, केंद्रीय युवा व्यवहार व क्रिडा राज्यमंत्री मा. रक्षाताई खडसे, राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री मा. श्री. संजयजी सावकारे, आमदार राजूमामा भोळे, मंगेशदादा चव्हाण, अनिलजी पाटील, किशोरजी आप्पा पाटील, अमोलदादा पाटील, चंद्रकांतदादा सोनवणे, चंद्रकांतदादा पाटील व अमोलजी जावळे आदींच्या उपस्थितीत उद्घाटन होणार आहे.

प्रदर्शनाबाबत माहिती देताना खासदार स्मिताताई वाघ पुढे म्हणाल्या की, या प्रदर्शनात केंद्र – राज्यातील विविध विभागांच्या वतीने चालविणाऱ्या जाणाऱ्या जनकल्याणकारी योजनांबाबत माहिती देणारे स्टॉल्स असणार आहेत. ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान या त्रयींचा सुरेख संगम असलेल्या या प्रदर्शनाचा जळगावाशियांनी प्रत्यक्ष भेट देऊन सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले. या पत्रकार परिषदेला भाजपा जिल्हाध्यक्ष (जळगाव महानगर) मा. श्री. दिपक सूर्यवंशी व भाजपा जिल्हाध्यक्ष (पश्चिम) मा. डॉ. राधेश्याम चौधरी, फ्रेंड्ज एक्झीबिशनच्या संचालिका तथा प्रोजेक्ट हेड अखिला श्रीनिवासन, संचालक आनंद पाल, दीपकसिंग मेहता, साक्षी सैनी आदी मान्यवर उपस्थित होते.

# अपंग जनता दल सामाजिक संघटनेतफे दिव्यांग तपासणी शिबीर

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मलकापुर** प्रतिनिधी

उपजिल्हा रूग्णालय मलकापूर येथे दि.०४ नोव्हेंबर मंगळवार रोजी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत अपंग जनता दल सामाजिक संघटनेच्या सतत प्रयत्नाने मागील दोन वर्षापासून उपजिल्हा रुग्णालय मलकापुर येथे नियमित पणे प्रत्येक बुधवारी अपंग बोर्ड असते परंतु मलकापूर बोर्डात जे तज्ञ डॉ. उपलब्ध नसल्याने तज्ञ डॉ.उपलब्ध करून दिव्यांग प्रमाणपत्र मिळणेकरीता विशेष तपासणी शिबीराचे आयोजन अपंग जनता दल संघटनेचे राज्य सचिव शेख कलीम यांनी केले आहे. शिबीरात विशेष तज्ञ डॉ निरज क्षिरसागर नेत्र तज्ञ उपजिल्हा रुग्णालय, मलकापुर, डॉ वैभव राणे फिजीशियन उपजिल्हा रुग्णालय मलकापुर, डॉ लाजुंळकर अस्थीव्यंग तज्ञ सामान्य रुग्णालय खामगाव, डॉ जयंत सोनुने कान नाक घसा तज्ञ सामान्य रुग्णालय खामगाव, डॉ एम. एम बाहेकर मानोसपचातज्ञ जिल्हा रुग्णालय बुलडाणा,रबडे किल्नीकल सायकॉलाजिस्ट अध्ययन अक्षम निदान व प्रमाणिकरण केंद्र जि.रु. बुलडाणा, श्रीमती प्रियका राठोडआडियोलॉजीस्ट, डि ई आय सी विभाग जिल्हा रुग्णालय बुलडाणा, वैद्यकिय अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय मलकापूर सह आदि तज्ञ डॉ.ची उपस्थिती राहणार असून अपंग, दिव्यागंनानी व गरजु रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'वेब डेव्हलपमेंट व एम.एस. ऑफिस' विषयावर पाच दिवसीय कार्यशाळा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी



खान्देश कॉलेज ऑफ एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट (स्वायत्त), जळगाव येथे दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ ते १ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत ''वेब डेव्हलपमेंट व एम.एस. ऑफिस'' या विषयावर पाच दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा द्वितीय वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली असून, विद्यार्थ्यांना वेब डेव्हलपमेंटच्या मूलभूत संकल्पना तसेच एम.एस. ऑफिसचे विविध उपयोग शिकविण्यात आले. या कार्यशाळेचे मार्गदर्शन सहाय्यक प्रा. नीरज कुमार पदमे व प्रा. अश्विनी देवराळे यांनी केले. या कार्यशाळेच्या आयोजनात प्रा. श्वेता चौधरी, प्रा. प्रिया पाटील आणि प्रा.कोमल चौधरी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे आयोजन विभागप्रमुख प्रा. अविनाश वाय. सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय आर. सुगंधी यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे समर्थन व प्रोत्साहन दिले. कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक कौशल्यवृद्धीबरोबरच व्यावहारिक ज्ञान वाढीस लागल्याचे मत सहभागी विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

# ॲग्रीस्टॅक उपक्रमांतर्गत शेतकरी खातेदारांना नोंदणी करण्याचे आवाहन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी



शासनाच्या कृषी विभागामार्फत राज्यातील सर्व शेतकरी खातेदारांचे एकत्रित डिजिटल डेटाबेस तयार करण्यासाठी ''ॲग्रीस्टॅक'' हा डिजिटल उपक्रम राबविण्यात येत आहे.सर्व शेतकरी खातेदार बांधवांना नैसर्गिक आपत्ती अनुदान तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी त्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी करून घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

या उपक्रमांतर्गत प्रत्येक शेतकरी खातेदाराचा डिजिटल शेतकरी आयडी तयार केला जाणार आहे. या आयडीद्वारे शेतकऱ्यांना सर्व कृषी विषयक शासकीय योजना, दुष्काळी अनुदाने, पिक विमा योजना तसेच इतर कृषी योजनांचा लाभ सुलभ व पारदर्शक पद्धतीने मिळणार आहे.

या नोंदणीसाठी सेतु सुविधा केंद्रे व महा ई–सेवा केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.नोंदणीसाठी, आधार कार्डाची प्रत, ७/१२ उतारा,बँक पासबुकची प्रत,मोबाईल क्रमांक,ही कागदपत्र आवश्यक आहेत. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना त्यांचा डिजिटल शेतकरी आयडी क्रमांक प्रदान करण्यात येईल.

यासाठी सर्व शेतकऱ्यांनी त्यांच्या गावातील ग्रामसेवक, ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहाय्यक तसेच सेतु सुविधा केंद्र किंवा महा ई–सेवा केंद्राशी संपर्क साधावा.फक्त ॲग्रीस्टॅक नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांनाच शासनाच्या विविध योजनेचा लाभ सुलभतेने मिळणार आहे.

ज्या शेतकऱ्यांनी अद्याप अग्रीस्टॅक नोंदणी केलेली नाही, त्यांनी वरीलप्रमाणे कागदपत्रांसह संबंधित अधिकाऱ्यांशी किंवा सेवा केंद्रांशी संपर्क साधून आपली नोंदणी तातडीने पूर्ण करावी आणि या डिजिटल उपक्रमाचा लाभ घ्यावा. असे जिल्हा प्रशासनाने, प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# स्थानिक संसाधने, लोकसहभागातून शाश्वत विकास शक्य : चैत्राम पवार

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी



स्थानिक संसाधनांचा वापर करून लोकसहभागातून शाश्वत विकास शक्य असल्याचे पद्मश्री पुरस्कार विजेते चैत्राम पवार यांनी प्रतिपादन केले.

रोटरी क्लब जळगाव आणि रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने मायादेवी नगरातील रोटरी भवन मध्ये आयोजित बदलाचं बीज बारीपाड्यापासून भारतापर्यंत या विषयावरील प्रकट मुलाखतीत ते बोलत होते.

व्यासपीठावर रोटरी जळगावचे अध्यक्ष गिरीश कुलकर्णी, मानद सचिव सुभाष अमळनेरकर, रोटरी सेंट्रलचे अध्यक्ष जितेंद्र बरडे, मानद सचिव ॲड. केतन ढाके यांची प्रमुख उपस्थिती होती. जल, जंगल, जमीन, जन आणि पशुधन हे पाच बिंदू मानून आम्ही शाश्वत विकासासाठी प्रयत्न केले. १९९०–९१ मध्ये डॉ. आनंद फाटक यांची झालेली भेट या कामासाठी दिशादर्शक ठरली. गावाने संघटित होऊन मोहाच्या झाडांची व्यावसायिक योजना, वनसंवर्धन, जलसंवर्धन, वन–धन –विकास योजना अशा विविध माध्यमातून अथक परिश्रम केले असे चैत्राम पवार यांनी मुलाखतीत प्रारंभी सांगितले.


आम्ही कुऱ्हाड बंदीतून ११०० एकर जंगल वाचविले आहे. त्याची किंमत आज ३ हजार कोटीपेक्षा जास्त आहे. लाकूड बंदी करण्यापूर्वी आयआयटी पवई यांच्या मदतीने सोलर कुकर व नंतर स्मोक लेस चुल्हा यामुळे महिलांना स्वयंपाकासाठी पर्याय उपलब्ध झाला असेही ते म्हणाले. अस्तित्व आणि अस्मिता सांभाळून क्लस्टर, योजक या माध्यमातून आम्ही विकासाकडे वाटचाल करीत असून सुरू असलेल्या कामात पारदर्शकता ठेवल्यामुळे या कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील दखल घेत विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे असे पवार म्हणाले. एअर फोर्स, कृषी विभाग आणि जळगाव जनता बँक या ठिकाणी नोकरीची संधी असताना देखील गावाचा विचार व नव्या पिढीचे भविष्य विचारात घेता समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पूर्णवेळ नाही पण जास्तीत जास्त वेळ कुटुंब सांभाळून या कार्यासाठी देत असल्याचेही त्यांनी सांगितले.

कबड्डी स्पर्धा, दिवाळी सुट्टीतील वनभोजन – श्रमदान, महिला बचत गटाचे माध्यमातून आरोग्य जतन, वनभाज्या स्पर्धा या विविध विषयातील उदाहरणांची त्यांनी सविस्तर माहिती दिली.

# सुवर्णा स्मृती उद्यानाचा आज लोकार्पण सोहळा

## आमदार मंगेश चव्हाण यांची संकल्पना

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चाळीसगाव** प्रतिनिधी






आमदार मंगेश चव्हाण यांच्या विशेष प्रयत्नांतून चाळीसगाव शहराच्या सौंदर्यात व शाश्वत विकासात भर घालणाऱ्या दोन विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन दि.२ रोजी संपन्न होत आहे. यात चाळीसगाव नगरपरिषदेच्या सुवर्णा स्मृती उद्यान नूतनीकरणच्या १० कोटी निधीतून पहिल्या टप्प्यातील कामाचे लोकार्पण व शहराची २०५६ पर्यंतची पाण्याची गरज लक्षात घेत १४२ कोटी रुपयांच्या नवीन सुधारित पाणीपुरवठा योजना कामाचे भूमिपूजन राज्याचे जलसंपदा मंत्री श्री.गिरीश महाजन यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२ रोजी सायंकाळी ६ वाजता सुवर्णा स्मृती उद्यान,बसस्थानक समोर येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्यान हे कोणत्याही शहराचं हृदय असतं. त्याची उपयोगिता, निकोपता त्या शहरातील सुदृढ व सशक्त स्वास्थाशी जोडलेली असते. चांगल्या पर्यावरणाची रुजवात अद्ययावत उद्यानामधून होते. धकाधकीच्या आणि धावपळीच्या युगात निवांत क्षणांचे साक्षीदार असे उद्यानचं असते. जिथे मनाला आनंदाचा मोरपीस स्पर्श करतो आणि थकलेल्या शरीराला नवचैतन्याची उभारी मिळते. आमदार मंगेश चव्हाण यांच्या संकल्पनेतून आपल्या चाळीसगाव शहरातील सुवर्णा स्मृती उद्यानाचे नुतनीकरण, उभारणी अशा स्मार्ट पद्धतीने केली आहे. उद्यानात साकारलेल्या सुविधा उच्च दर्जाच्या असून त्यासाठी वापरण्यात आलेले साहित्य जागतिक मानांकनाची मुद्रा कोरलेले आहे. जिथे पर्यावरण, अध्यात्म आणि मानसिक स्वास्थ या तिघांची गळाभेट होते....माणूस काही क्षणांसाठी ताजातवाना होतो... जी उर्जा त्याला दरदिवसाची सुरुवात आनंदी करण्यासाठी बळ देईल. आपल्या जीवलगांसह परिवारालाही मनःशांतीचा पाडवा अनुभवता येईल आणि अवीट समाधानाचे अभ्यंगस्नानही होईल.

सोबतचं *चाळीसगाव शहरासाठी १४२ कोटी रुपये खर्चाच्या पाणीपुरवठा योजनेचा भूमीपुजन शुभारंभही होत आहे. या योजनेमुळे पुढील तीन दशके म्हणजे २०५६ पर्यंतची लोकसंख्या वाढ गृहीत धरुन प्रति माणसी १३५ लिटर पाणी देणे शक्य होणार आहे. शहरातील पाणीपुरवठा देखील सुरळीत होईल. योजनेत अद्ययावत तंत्रज्ञान वापरण्यात येणार असून शहरात चार नवीन जलकुंभांचीही उभारणी करण्यात येणार आहे. उद्यानाचा लोकार्पण सोहळा आणि पाणीपुरवठा योजनेचा भूमीपुजन शुभारंभ सोहळ्यासाठी तसेच स्मार्ट चाळीसगावच्या निर्माणाचे साक्षीदार होण्यासाठी जास्तीत जास्त चाळीसगावकरांनी उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय जनता पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पेरुची भरलेली आयशर गाडी नदी पात्रात कोसळली : चालक बचावला

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भडगाव** प्रतिनिधी

भडगाव येथील पेठ भागाकडुन भडगावकडे पेरुने भरलेली आयशर गाडी अचानक पुलाच्या खाली नदी पात्रात कोसळली. ही घटना घडताच घटनास्थळी मदतीसाठी नागरीकांनी धाव घेतली.या घटनेतुन गाडीवरील चालक बाल बाल बचावला असुन किरकोळ जखमी झाला त्याचेवर खाजगी दवाखान्यात प्राथमिक औषधोपचार सुरु आहेत. ही घटना दि.३१रोजी रात्री ८ वाजेच्या सुमासास घडलेली आहे.पोलीस स्टेशनला रात्री उशीरा पर्यंत नोंद नसल्याची माहिती भडगाव पोलिसांतर्फे दै.लोकशाही शी बोलतांना दिली. मात्र या गिरणा नदीच्या पुलावर खड्डयांच्या साम्राज्याचा विषय नेहमी आम्ही भडगाव या वॉट्स ॲप गृपवर गाजतो.त्याचबरोबर स्थानिक नागरिकांनी सुध्दा या गिरणा नदीच्या पुलावरील खड्डे बुडविण्यासह वेळोवेळी आवाज उठविला. मात्र संबंधीत प्राधिकरण विभाग अपयशी ठरल्याचे दिसुन आले. अशातच ही आयशर गाडी या गिरणा नदीवरील खड्डयांची बळी ठरली कि चालकाचा तोल गेल्याने ही आयशर गाडी गिरणा नदीच्या पात्रात कोसळली हा प्रश्न सर्व सामान्य नागरीकांसह वाहनधारकातुन होतांना दिसत आहे.आतातरी प्रशासन अपघाताची होणारी रांगोळी पुसण्यासाठी पुढाकार घेईल काय? असा प्रश्न सर्वसामान्य नागरीकातुन उपस्थित होतांना दिसत आहे.



# खान्देशचे प्रति पंढरपूर शेंदुर्णीत रथोत्सवास प्रारंभ

## भक्त पुंडलिकाची सवाद्य मीरवणुक ; ४ नोव्हेंबर रोजी रथोत्सव

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**शेंदुर्णी** प्रतिनिधी



खान्देश चे प्रति पंढरपुर नगरी असलेल्या शेंदुर्णी येथे रथोत्सव ४ नोव्हेंबर रोजी साजरा होणार २८१ वा रथोत्सव सोहळा प्रति पंढरपूर म्हणून ओळख असणाऱ्या शेंदुर्णी नगरीमध्ये २८१वा रथ सोहळा ४नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणार आहे.यानिमित्ताने सोन नदीच्या काठावर मोठ्या प्रमाणावर यात्रा भरत असते. त्या पूर्वी विविध कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे शुक्रवार ३१ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी श्री त्रिविक्रम महाराजांच्या मंदिरासमोर ह भ प शांताराम महाराज भगत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले .आज १ नोव्हेंबर शनिवारी रोजी भक्त पुंडलिकाची मिरवणूक काढण्यात आली. भगवान श्री त्रिविक्रम महाराज यांच्या मंदिरात संतश्रेष्ठ कडोजी महाराज संस्थानचे वतीने डबी बसवण्यात आली.. दुपारी संत कडोजी महाराज यांच्या समाधी जवळ संतश्रेष्ठ कडोजी महाराज संस्थानचे गादीवारस हभप शांताराम महाराज भगत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले व रात्री नगर प्रदक्षिणा झाली.२ नोव्हेंबर रोजी तुलसी विवाह निमित्त ह भ प प्रभाकर महाराज जळगांवकर (वावडदे)यांचे कीर्तन होईल रात्री बारा वाजता तुलसी विवाह साजरा केला जाईल ३ नोव्हेंबर रोजी ग्रामस्थ भजनी मंडळ महिला मंडळी चोपदार, डपवाले ,मशाल वाले, यांच्या समवेत भव्य प्रमाणात पालखी सोहळा पार पडेल ४ नोव्हेंबर रोजी दुपारी १२.००वाजता रथाची पूजा आरती करून रथ मार्गस्थ होईल ५ नोव्हेंबर रोजी संत कडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त कीर्तन होईल ६ नोव्हेंबर रोजी त्रिविक्रम महाराजांच्या मंदिरामध्ये दहीकाला होईल ९ नोव्हेंबर रोजी भक्त पुंडलिकाची मिरवणूक काढली जाईल व संत कडोजी महाराज विठ्ठल रुक्मिणी रथोत्सवाची सांगता रथघरात गांधी चौक येथे होईल या सर्व कार्यक्रमासाठी तण मनधनाने सहकार्य करावे व भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन संत कडोजी महाराज संस्थांनचे ८ वे गादीवारस वहिवाटदार ह.भ.प शांताराम महाराज भगत , मुख्याधिकारी व प्रशासक विवेक धांडे , पोलिस उपनिरीक्षक नंदकुमार शिंब्रे ग्रामस्थ मंडळी व भजनी मंडळी यांनी केले आहे.

लोक LIVE
तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

Download Our Apps — GET IT ON Google play

१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

www.lokshahilive.com

जळगाव, रविवार, दि.२ नोव्हेंबर २०२५ | RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 | • अंक -३५१ • पाने ६ • किंमत ३ रु.

# ...तर त्यांना दिसतील तिथे फोडून काढा!

## राज ठाकरेंचा मतदार यादीतील घोळावरून कार्यकर्त्यांना आदेश ; महाविकास आघाडीचा निघाला ‘सत्याचा मोर्चा’

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुंबई ✍ प्रतिनिधी

राज्यात ३१ जानेवारी २०२६ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार आता राज्य निवडणूक आयोगही कामाला लागला आहे. मात्र, न्यायालयाच्या आदेशानंतर विरोधी पक्षांनी मतदार याद्यांमधील घोळाचा मुद्दा उपस्थित केला आहे. हे घोळ संपल्यानंतरच निवडणुका घ्या, अशी मागणी महाविकास आघाडीकडून करण्यात आली आहे. याच मागणीसाठी आज मुंबईत महाविका आघाडीसह सर्व विरोधी पक्षांनी ‘सत्याचा मोर्चा’ काढला. या मोर्चामध्ये मनसे अध्यक्ष राज ठाकरेही सहभागी झाले होते. यावेळी राज ठाकरेंनी आपल्या भाषणात खळ्ळखट्याक् करण्याचं आवाहन कार्यकर्त्यांना केलं.

फॅशन स्ट्रीटपासून मुंबई महानगर पालिका भवनापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. मोर्चा संपल्यानंतर झालेल्या सभेत राज ठाकरेंनी मतदार याद्यांमधील गोंधळावरून निवडणूक आयोगाला खडे बोल सुनावले. ‘‘आम्ही बोलतोय, उद्धव ठाकरे बोलतायत, शरद पवार बोलतायत की याद्यांमध्ये दुबार मतदार आहेत. शेतकरी कामगार पक्षही बोलतोय,



कम्युनिस्ट पक्षाचे लोक बोलतायत, काँग्रेसचे लोक बोलतायत. एवढंच नाही, भाजपाचेही लोक बोलतायत की दुबार मतदार आहेत. शिंदेंचे, अजित पवारांचेही लोक बोलतायत. अरे मग अडवलं कुणी? मग हे निवडणूक घेण्याची घाई का करत आहेत? साधी गोष्ट आहे.



मतदारयाद्या साफ करा. त्यानंतर जेव्हा निवडणुका होती, त्यात यश-अपयश सगळ्या गोष्टी मान्य असतील’’, असं राज ठाकरे म्हणाले.

**निवडणूक आयोगाच्या विरोधात न्यायालयात जाणार-उद्धव ठाकरे**

उद्धव ठाकरे सभेत म्हणाले की, मी आणि राज दोघंही भाऊ एकत्र आलो आहोत. पण आम्ही तुमच्यासाठी आलो आहोत. मराठी माणसांसाठी. हिंदूंसाठी आणि महाराष्ट्रासाठी आलो आहोत. आम्ही पुढे जात असताना तुम्ही साथ दिली पाहिजे. साथ देण्याची धमक असेल तर हाताची मूठ वळवून दाखवा. हा फोटो मतचोराच्या बादशाहकडे पाठवा. मतचोरी केली तर ही मूठ तुमच्या टाळक्यात हाणल्याशिवाय राहणार नाही असं उद्धव ठाकरे म्हणाले. ५ जुलैला उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आले होते. त्यानंतर या दोघांच्या चार महिन्यांत दहा भेटीगाठी झाल्या. या दोघांच्या युतीची घोषणा बाकी होती. मात्र आज सत्याचा मोर्चात भाषण करत असताना उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंसह एकत्र येण्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या. खासदार संजय राऊत यांनी तर पाच महापालिका एकत्र लढवण्यावर दोन्ही ठाकरे बंधूंचं एकमत झाल्याचंही सांगितलं होतं. मात्र ठाकरे बंधूंकडून अद्याप युतीची थेट घोषणा झाली नव्हती. आज उद्धव ठाकरेंनी एकत्र येण्याचं कारणच सांगितलं आणि एका अर्थाने युतीची घोषणाच केली आहे. त्यामुळे आगामी काळात ठाकरे बंधू महापालिका निवडणुका एकत्र लढतील यात काही शंका नाही. उद्धव ठाकरे म्हणाले, निवडणूक आयोगाविरोधात आम्ही मोठं पाऊल उचलणार आहोत. चोर दिसेल त्याला तिथेच फटकवा. लोकशाही मार्गाने फटकवा. आम्हाला कायदा हातात

पान २ वर »

### राज ठाकरेंनी सादर केले पुरावे

येत्या निवडणुकांमध्ये जर दुबार मतदार दिसला, तर तिथल्या तिथे बडवून काढा, असं आवाहन राज ठाकरेंनी उपस्थित कार्यकर्त्यांना केलं. ‘‘जेव्हा कधी निवडणुका होतील, तेव्हा याद्यांवर तुम्ही सगळे काम करा. चेहरे कळले पाहिजेत. जर त्यानंतर हे दुबार-तिबारवाले आले, तर तिथेच फोडून काढायचे. बडव बडव बडवायचे आणि मग पोलिसांच्या हातात द्यायचे. त्याशिवाय हे वठणीवर येणार नाहीत’’, असं राज ठाकरे म्हणाले. मतदार याद्यांमध्ये अनेक बनावट मतदार, दुबार मतदान करणारे मतदार असल्याचा दावा विरोधकांनी केला आहे. खुद्द लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यापासून आदित्य ठाकरे, राज ठाकरे यांनीही वारंवार यासंदर्भात विविध प्रकारची कागदपत्रे दाखवून दावे केले आहेत. त्यानंतरही सत्ताधाऱ्यांकडून पुराव्यांची मागणी केली जात आहे. त्यावर राज ठाकरंनी आपल्या भाषणात चक्क गठ्ठ्यांचा एक ढीगच पुराव्यादाखल दाखवला. हे सगळे दुबार मतदार असल्याचं राज ठाकरे म्हणाले. काही मतदारसंघांची यादीही यावेळी राज ठाकरेंनी वाचून दाखवली. ‘‘एवढे पुरावे देऊनही हट्ट चालू आहे की कोर्टानं निवडणुका घ्यायला सांगितल्या आहेत. कशाला? कुणाला घाई आहे? ५ वर्षं निवडणुका झाल्या नाहीत, आणखी एक वर्षं नाही झाल्या तर काय फरक पडणार आहे? पण जे लोक आत भरले आहेत त्यांचं काय करायचं? त्यामुळे त्यातल्या त्यात निवडणुका घेऊन यश मिळवायचं चाललंय. याला काय निवडणुका म्हणतात?’’ असा सवालही राज ठाकरेंनी केला.

### संविधानाचे जतन करण्याची वेळ-शरद पवार

आपण स्वतःसाठी काहीही मागत नाही. आपण एवढंच म्हणतो आहोत की लोकशाहीत संविधानाने जो अधिकार आपल्याला दिला त्याचं जतन करण्याची वेळ आली आहे. निवडणुका झाल्या आणि त्या निवडणुकीमध्ये विशेषतः विधानसभा निवडणुकीत जे काही झालं त्यामुळे सामान्य माणसाचा संसदीय लोकशाहीवर जो विश्वास होता त्याला धक्का बसला. आज अनेक ठिकाणी लोक अस्वस्थ आहेत. सत्तेचा गैरवापर सातत्याने केला जातो आहे. या सगळ्याला तोंड द्यावं लागेल. राजकीय मतभेद असू शकतात. निवडणुकांमध्ये संघर्ष असू शकतात पण या सगळ्या गोष्टी विसरुन आपल्याला एक व्हावं लागेल. लोकशाहीचा जो अधिकार आहे तो आपल्याला जतन करावं लागेल. हाच दृष्टीकोन समोर ठेवून आपल्याला वाटचाल करावी लागेल. काही ठिकाणी काही लोकांनी तक्रारी केली. बनावट आधारकार्ड तयार करुन मिळतात अशा त्या तक्रारी होत्या. कलेक्टर म्हणाले सिद्ध करा, पुरावे दिले गेले. मात्र ज्यांनी आरोप केला त्यांच्यावरच गुन्हे दाखल करण्यात आले. याचा अर्थ हे शासन या सगळ्याला समर्थन देतं आहे. आमच्या विचारधारा वेगवेगळ्या आहेत. पण देशाची संसदीय लोकशाही ही टिकवायची असेल, मतदानाचा अधिकार टिकवायचा असेल तर तुम्हाला आणि मला एक व्हावं लागेल. आज व्यासपीठावर असलेले नेते याच भावनेतून एकत्र आले आहेत एवढंच मी या ठिकाणी सांगतो आणि आपली रजा घेतो असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

# आंध्र प्रदेशातील वेंकटेश्वर मंदिरात चेंगराचेंगरी, १० जणांचा मृत्यू

लोकशाही न्यूज नेटवर्क
नवी दिल्ली ✍ वृत्तसंस्था

आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम येथील कासीबुग्गा वेंकटेश्वर मंदिरात चेंगराचेंगरीत १० जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले आहेत, असे वृत्त पीटीआयने दिले आहे. प्राथमिक वृत्तानुसार, शनिवारी एकादशीनिमित्त मंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली होती. यावेळी रेलिंग कोसळल्याने एकच गोंधळ



उडाल्याने ही दुर्घटना घडली. जखमी भाविकांना रुग्णालयात नेण्यात आले.

श्रीकाकुलम वेंकटेश्वर मंदिर हे आंध्र प्रदेशातील प्रसिद्ध आहे. हे मंदिर ११व्या-१२व्या शतकात, चोल आणि चालुक्य शासकांच्या या प्रदेशातील प्रभावादरम्यान बांधले गेले असे मानले जाते. ‘‘उत्तरेचा तिरुपती‘‘ अशी त्याची ओळख आहे. एकादशीनिमित्त मंदिरात भाविकांची प्रचंड गर्दी झाली

पान २ वर »

# पाचोऱ्यात शेतकऱ्यांचे जेलभरो आंदोलन

## बच्चू कडु यांच्या शेतकरी आंदोलनाला दिले समर्थनार्थ

लोकशाही न्यूज नेटवर्क
पाचोरा ✍ प्रतिनिधी

पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी ठरल्याप्रमाणे प्रथम छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र येत सर्व महापुरुषांना माल्यार्पण करत जोरदार शेतकरी समर्थनार्थ घोषणाबाजी करत परिसर दनानून सोडला. त्यानंतर प्रांताधिकारी यांच्या कार्यालयाबाहेर येवून शेतकरी हितार्थ घोषणाबाजी केली व तेथेच नायब तहसिलदार विनोद कुमावत, पोलिस



निरीक्षक राहुलकुमार पवार, व प्रांताधिकारी यांचे निवेदन देवून शेतकऱ्यांच्या मागण्यांविषयी पत्रकार बांधवांशी संवाद साधला. पुढे सर्व उपस्थित शेतकरी बांधवांनी पोलीस निरीक्षक यांच्याकडे शासनाचे शेतकऱ्यांच्या जळजळीत वास्तव प्रश्नांकडे वेळीच लक्ष वेधण्यासाठी स्वतःला अटक करून घेतली. पोलीस निरीक्षक व स्टाँपने सर्वांची नोंद घेवून शेतकर्यांची थोड्या वेळाने सुटका केली.अशा प्रकारे खालील प्रमुख मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी जेलभरो आंदोलन केले. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा, वाढलेल्या महागाईनुसार शेतकर्यांचा शेतमाल हमीभाव वाढवावा व त्याची वेळीच १०० टक्के काटेकोरपणे अंमलबजावणी वेतन आयोग प्रमाणे नैसर्गिक तत्वावर करावी आणि त्यात काही अडचणी आल्यास तत्काळ समांतर भावांतर योजना २४ / ७ सुरू करुन शेतकऱ्यांना त्यांच्या बँक खात्यावर १५ दिवसांत फरक द्यावा, भारतीय न्यायालयांनी

पान २ वर »

# निवडणूक आयोगाचे भागीदार म्हणून काम : वडेट्टीवार

लोकशाही न्यूज नेटवर्क
नागपूर ✍ वृत्तसंस्था

निवडणूक आणि मतदार याद्यांमध्ये पारदर्शकता असावी. निवडणूक आयोग या बाबतीत सरकारचा भागीदार झाल्याप्रमाणे वागत आहे, असा आरोप काँग्रेसचे गटनेते विजय वडेट्टीवार यांनी केला. आमच्या शिष्टमंडळाने



आयोगाला विचारले असता त्यांच्याकडे समाधानकारक उत्तर नव्हते. एका घरात चारशे लोक कसे दाखवले जाऊ शकतात? हा घोटाळा कोणाच्या इशाऱ्यावर केला गेला? असा प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

मतदार यादीतील गडबड ही स्पष्टपणे फसवणूक आहे. बोगस मतदार तयार करून निवडणूक जिंकण्याचा हा नवीन फंडा आहे, असा दावा करून आज आम्ही मोर्चाद्वारे निवडणूक आयोगाला इशारा देत आहोत. ही बाब स्वच्छ केली नाही आणि तुम्ही भाजपचे सहकारी पक्ष म्हणून काम करत असाल तर देशातील लोकशाही आणि उद्याचे भविष्य धोक्यात येईल. अन्यथा त्यांना जागेवर आणण्याचा इशारा देणारा हा मोर्चा असल्याची सूचना दिली. कुणाचे नेतृत्व कुणाचे झेंडे हा प्रश्न

पान २ वर »

# सारखं फुकटात कसं चालणार?

## अजित पवारांचे शेतकरी कर्जमाफीवर वादग्रस्त विधान!

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुंबई ✍ प्रतिनिधी

शेतकरी कर्जमाफी ३० जूनपूर्वी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असतानाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कर्जमाफीवरूनच एक वादग्रस्त विधान केले आहे. शेतकऱ्यांनी सुद्धा वेळेत कर्ज फेडण्याची सवय



लावावी. सारखं फुकटात कसं चालणार? असा सवाल त्यांनी केला आहे. अजित पवार यांच्या या विधानामुळे वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

शेतकरी कर्जमाफीचे सर्व टप्पे राज्य सरकारने निश्चित केले आहेत. कर्जमाफी कशी करायची आणि शेतकरी कर्जाच्या विळख्यात अडकू नये यासाठीच्या दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्यासाठी राज्य सरकारने उच्चस्तरीय समिती नेमली आहे. एप्रिल

पान २ वर »

# पणन महासंघाला तब्बल 100 कोटी रुपयांचा विक्रमी नफा

## महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित, मुंबईची ६७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव ✍ प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित, मुंबईची ६७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच उत्साहात संपन्न झाली. या सभेला महासंघाचे सर्व संचालक, सभासद तसेच विविध जिल्ह्यातील सहकारी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सभेच्या अध्यक्षस्थानी महासंघाचे उपाध्यक्ष रोहित निकम होते. यावेळी आपल्या मनोगतात



बोलताना त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण मागण्या आणि सूचना मांडल्या.

त्यांनी म्हटले की, ‘‘शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा वेळेवर हमीभाव मिळावा, यासाठी केंद्र सरकारने आवश्यक ती यंत्रणा वेळेत कार्यान्वित करावी. तसेच नोंदणीसाठी सुलभ व्यवस्था, बारदानाचा मुबलक पुरवठा आणि हमीभावासाठी केंद्राकडून वेळेत मंजुरी मिळणे अत्यावश्यक आहे.’’

उपाध्यक्ष निकम यांनी पुढे सांगितले की, राज्य सरकार व नाफेडकडे बाकी असलेल्या अ वर्ग आणि ब वर्ग संस्थांचे देणे तातडीने दिले जावे, अशी मागणी पणन महासंघामार्फत करण्यात आली आहे.

पान २ वर »

### रोहित निकम यांनी मानले केंद्र सरकारचे आभार

‘‘हा अभिमानाचा क्षण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय सहकार मंत्री अमितभाई शहा, पणन मंत्री प्रल्हाद शहा यांच्या सहकार्यामुळेच हा यशाचा टप्पा गाठता आला आहे. यावर्षी ‘आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष’ असून, त्याच वर्षी पणन महासंघाने ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे, हे आमच्यासाठी अभिमानास्पद आहे.’’

### सोने-चांदी

- **सोने** (प्रति १० ग्रॅम) : १,२१,४००
- **चांदी** (प्रति १ किलो): १,५३,०००

### तापमान

- **कमाल** : ३३ अंश सेल्सिअस
- **किमान** : १३ अंश सेल्सिअस

### महत्वाचे »»

#### सत्याच्या मोर्चात शरद पवारांची गैरसोय

**मुंबइ :** विरोधकांच्या वतीने सत्याचा मोर्चा आयोजित करण्यात आला होता. निवडणूक आयोगाच्या विरोधातील या मोर्चाला राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह विरोधी पक्षातील अनेक नेते उपस्थित होते. या मोर्चावेळी शरद पवारांची गैरसोय झाल्याचे पहायला मिळाले. यामुळे खासदार सुप्रिया सुळे संतापल्या होत्या. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

विरोधकांच्या मोर्चाच्या वेळी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांची गैरसोय झाल्याचे पहायला मिळाले. यामुळे खासदार सुप्रिया सुळे संतापल्या होत्या. शरद पवार यांची गाडी निश्चित स्थळी न पोहचल्यामुळे शरद पवार यांच्या नियोजनाची जबाबदारी देण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांवर सुप्रिया सुळे संतापल्याचे दिसून आले. शरद पवार हे उद्धव ठाकरे, राज ठाकरे यांच्यासोबत मोर्चातून चालत आले आणि मंचावर गेले. यानंतर गाडी ठरलेल्या ठिकाणी न पोहचल्याने सुप्रिया सुळे पदाधिकाऱ्यांवर ओरडल्या. शरद पवार डिव्हायडर ओलांडून आल्यानंतर सुप्रिया सुळे यांनी पोलीसांशी बोलून गाडी स्टेजच्या मागे लावण्याची व्यवस्था केली. निवडणूक आयोगाच्या विरोधातील मोर्चात बोलताना शरद पवार म्हणाले की, ‘देशाची लोकशाही टिकवण्यासाठी कष्ट करायला तयार असलेले तुम्ही बंधू भगिनी. आजचा मोर्चा मला जुन्या गोष्टी आठवण करून देतो. मला आठवतंय १९७८-८९ या काळात महाविद्यालयात शिकत असताना संयुक्त महाराष्ट्रात असाच मोर्चा निघाला होता. काळा घोडा आणि त्याचा परिसर तिथे मोर्चे एक प्रकारचा विचार समन्वय दाखवणारे मोर्चे होते. तुम्ही सर्वांनी जी जबरदस्त एकजूट दाखवली. त्यातून संयुक्त महाराष्ट्राची चळवळ होती, त्याची आठवण होते. आज महत्त्वाचा विषय आपण हातात घेतला. आपण स्वतसाठी काही मागत नाही. आपण एवढंच म्हणतोय की लोकशाहीत संविधानाने तुम्हा आम्हाला अधिकार दिला त्याची जतन करणं याची वेळ आली आहे.’

#### व्हिडिओ कॉलनंतर गळफास!

**पुणे :** कौटुंबिक त्रासातून एका व्यक्तीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. नितीन अशोक साळवे (वय ४२, रा. लक्ष्मीनगर, पर्वती) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. याबाबत नितीन यांची बहीण पूनम उमेश कांबळे (वय ४०, रा. कोकिळा बिल्डिंग, बालाजीनगर) यांनी पर्वती पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

जळगांव 0257 - 2237491, 9422775011, 8999256713 | ठाणे -मुंबई - 9422284511 | नाशिक-9890525925 | पुणे - 9209832828 | lokshahilive@gmail.com, lokshahi@hotmail.com